# संपादकीय

कॉमनमॅन जागा व्हायची वेळ आलीय...

वेड्नेसडे नावाचा चित्रपट पाहिलाय ? मुंबईत सततच्या दहशतवादी घटनांनी असुरक्षिततेची भावना निर्माण झालेला सामान्य नागरीक अवघ्या एका दिवसात सबंध पोलिस यत्रणा आणि राज्य सरकारला हलवून सोडतो. एव्हाना कशाशी कसलाच संबंध नसलेला सामान्य नागरीक जेंव्हा दहशती कृत्याकडे वळतो तेंव्हा शासनयंत्रणेची कशी ऐशीतैशी होते याचे सुंदर चित्रण या चित्रपटातून करण्यात आले आहे. राजकारण्यांच्या खेळात स्वतःला हरवून बसलेला सामान्य नागरीक आपल्यातही ताकद असते हेच विसरून गेला होता. या चित्रपटानंतर त्यात काही अंशी बदल घडेल हे नक्की. मात्र गेली अनेक वर्षे या कॉमन मॅनमध्ये ही मरगळ का आली याचेच विश्लेषण होण्याची गरज या निमित्ताने निर्माण झाली आहे. देशाला दहशती कृत्यांनी पोखरले असताना वारंवार सजगतेचे दर्शन घडविणारा कॉमनमॅन खरोखर जागा व्हायची वेळ आली आहे.

जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या या भारतात लोकसभेच्या निवडणूका जेमतेम एका वर्षाचा अवधी उरला असतानाच देशभराला आतंकवादी कारवायांनी वेग घेतला आहे. सहिष्णू समजल्या जाणाऱ्या भारतीयांत भय ,असुरक्षिततेची भावना कायम राहावी, देशाच्या विकासाचा वेग थांबवावा या प्रयत्नात दहशतवादी संघटना आहेत. एव्हाना त्यांना याचसाठी इस्लामी राष्ट्रांकडून मोठ्या प्रमाणावर पतपुरवठा होतो. ते करीत असलेल्या दहशती कृत्याचा परिणाम सर्वव्यापी आणि सर्वसामान्य नागरीकांच्या मनात प्रदीर्घकाळ राहिल या हेतूने दहशतवाद्यांनी मुंबईसारखी प्रचंड गर्दीची शहरे नेहमीच लक्ष्य केली. असामाजिक तत्वांच्या देशविघातक कारवायांनी पिचलेला सामान्य नागरीक अशा प्रकारच्या घटनांचे खापर सरकारी यंत्रणांवर खापर फोडतो. देशाची सातत्याने वाढत असलेली लोकसंख्या, रोजगाराची संधी उपलब्ध असलेल्या मुंबईसारख्या शहरांत येणारे परप्रांतीयांचे लोंढे आणि त्यांना नियंत्रित करण्यात सक्षम नसलेली यंत्रणा या सगळ्या बाबी दहशती कारवायांना जबाबदार असल्याचे म्हटल्यास वावगे ठरू नये. या सगळ्या घडोमोडींच्या पार्श्वभूमीवर मुंबई हे उत्तम उदाहरण आहे. नेहमीच अतिरेक्यांच्या हिट लिस्टवर असलेल्या या शहरात दहशतवादी संघटनांचे कितीतरी स्लिपर सेल राजरोसपणे फिरत असल्याचे चित्र आहे. जयपूर, अहमदाबाद आणि बंगळूरू येथे इंडियन मुजाहिदीनने घडविलेल्या बॉम्बस्फोटांचा महत्वाचा आरोपी तौकिर उर्फ अब्दुस सुभान कुरेशी मीरारोडच्या ज्या नयानगरमध्ये राहायचा त्या ठिकाणच्या नागरीकांत त्याची प्रतिमा एका उमद्या तरूणाचीच होती. बॉम्बस्फोटांचे कट रचण्यासाठी या स्फोटांचा मुख्य सुत्रधार रियाज भटकळ याने देशात बॉम्बस्फोट घडविण्याकरीता गोवंडी, चिताकॅम्प आणि कुर्ला या मुस्लिमबहूल वस्त्यांचा वापर केला. या ठिकाणी होणाऱ्या इंडियन मुजाहिदीनच्या बैठकांना देशाच्या विविध भागातून सिमीची कार्यकर्ते येत. या परीसरात राहणाऱ्या कथित कॉमनमॅनला मात्र या सगळ्या प्रकाराचा उलगडा व्हायला बराच उशिर झाला.स्फोटांचा तपास करताना अतिरेक्यांनी पोलिसांना दिलेल्या माहितीनंतरच स्फोटांचा कट मुंबईतच आखल्याचे कळले. गेल्या तीन वर्षापासून देशात अ तिरेकी कारवाया करणाऱ्या वीस जणांच्या अटकेचा एक चांगला किस्सा सांगितला जातो. एका सजग नागरीकाने दाखविलेल्या धाडसामुळे बॉम्बस्फोटाचे प्रकरण उघडकीस येण्यात मोठा हातभार लागला. या अतिरेक्यांपैकी एक जण कॉम्प्युटर इंजिनिअर म्हणून एका मोठ्या एमएनसी मध्ये काम करीत होता. या अतिरेक्याच्या संशयास्पद कृत्यांची माहिती त्या कॉमन मॅनने तातडीने पोलिस अधिकाऱ्यांना दिली. त्यानंतरच देशातील मोठ्या स्फोटांचा हा प्रकार उघडकीस आला. मुंबईचे पोलिस आयुक्त हसन गफूर यांनी या अतिरेक्यांना अटक केल्यानंतर घेतलेल्या पत्रकार परीषदेत अशा सजग मुंबईकरांचे आभार मानले.

**अविनाश गारगोटे**